**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

## वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

**उपाध्यक्ष :** आज सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे यांचा जन्मदिन असल्यामुळे मी सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

**पृ.शी./मु.शी :** तोंडी उत्तरे

## मुंबईतील भायखळा येथील सर जे. जे. रुग्णालयातीत वारसा हक्काने देण्यात येणाऱ्या नियुक्त्या प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ४१०२५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, भायखळा येथील सर जे. जे. रुग्णालयातील सेवानिवृत्त किंवा मृत्यूमुळे सेवा समाप्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्त्या देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसा हक्कास लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार रुग्णालय प्रशासनाकडे सादर करण्यात आलेल्या अर्जानुसार सन २०१४ पासून नियुक्त्या देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाने गठीत केलेल्या समितीने नव्याने तयार केलेल्या ज्येष्ठता यादीतील नियुक्त्या अजूनही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रलंबित नियुक्त्या लवकरात लवकर होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

ता.प्र.क्र. ४१०२५ ......

श्री. अमित देशमुख......

(४) लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार पात्र असलेल्या वारसदारांना नियुक्त्या देण्याबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे मी आपणस विनंती करतो की, माननीय मंत्री सभागृहामध्ये येईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

**उपाध्यक्ष :** माननीय मंत्री हे वरच्या सभागृहामध्ये होते. ते आता आलेले आहेत. आता आपण प्रश्न विचारावा.

श्री. अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रश्न अतिशय महत्त्वाचा असून तो सर जे.जे. रुग्णालयासंदर्भातील आहे. माननीय मंत्री महोदयांनी कोरोना काळात अतिशय चांगले काम केले आहे. हा प्रश्न सर जे.जे. रुग्णालयातील सफाई कामगारांचा आहे. हा प्रश्न सुटला पाहिजे, यासाठी मी मागील दोन वर्षापासून सातत्याने प्रयत्न करीत आहे. लाड-पागे समितीने आदेश देऊन नोकरी दिली पाहिजे, असे सांगितले आहे. याबाबत शासनाचेही धोरण आहे. त्या लोकांना नोकरी मिळाली पाहिजे. हा त्यांचा हक्क आहे. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, हा प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविण्यात आला आहे. मी यानिमित्ताने मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, सन २०१४ पासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्या कर्मचाऱ्यांना किती दिवसांमध्ये नोकरी दिली जाणार आहे ? माननीय मंत्री हे विषयाच्या बाहेर जाऊन उत्तर देत असतात. हे अतिशय चांगले आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जे.जे. रुग्णालय आणि इतरही वैद्यकीय रुग्णालयात निवासी डॉक्टर कार्यरत असतात. त्या डॉक्टर्सना नियमित करण्याबाबत सातत्याने प्रश्न मंत्री

ता.प्र.क्र. ४१०२५ ......

श्री. अमिन पटेल....

महोदयांकडे येतात. मंत्री महोदय नेहमी त्यांची बाजू घेत असतात. परंतु मी सांगू इच्छितो की, हा विषय प्रलंबित आहे. त्याबाबत कधीपर्यंत निर्णय घेऊन त्या निवासी डॉक्टर्सला नियमित करण्यात येणार आहे ? तसेच राज्यातील १८ वैद्यकीय महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक मागील ४५ दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. यामुळे रुग्णालयाची सेवा कोलमडली आहे. एम.बी.बी.एस.चे क्लासेस बंद आहेत. तेथे प्रवेश घेतले जात नाहीत. त्याचप्रमाणे एम.डी.साठीच्या परीक्षाही बंद आहेत. यामुळे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, त्यांनाही कधीपर्यंत नियमित केले जाणार आहे ? मला खात्री आहे की, मंत्री महोदय सर्व प्रश्नांची सकारात्मक उत्तरे देतील.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मला सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला उपस्थित राहण्यास विलंब झाल्यामुळे मी सर्वप्रथम सभागृहाची दिलगिरी व्यक्त करतो. दोन सेंकद विलंब होऊ नये, अशी या सभागृहाची परंपरा आहे. या विलंबाबात मी कोणतेही कारण सांगणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालयात वारसा हक्काने देण्यात येणाऱ्या नियुक्त्या प्रलंबित आहेत, याबाबत अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे.

यानंतर श्री. चौधरी.....

ता.प्र.क्र.४१०२५.....

श्री.अमित देशमुख.....

या निमित्ताने मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, सन २०१४ पासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे वारसाहक्काने नोकरी मिळण्यासाठीचा ज्यांचा प्रश्न शासनाकडे प्रलंबित आहे त्यांच्यावर अनेक वर्षांपासून अन्याय झाला आहे व त्याबद्दल देखील मी खेद व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांचा प्रश्न असा आहे की, किती दिवसांमध्ये हा विषय मार्गी लागेल ? त्या अनुषंगाने मी त्यांना आश्वस्त करु इच्छितो की, हे प्रकरण अंतिम टप्प्यात आहे. या प्रकरणी लाड-पागे समितीची अंतिम मान्यता आवश्यक असल्याने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शिफारशींसह आपला अहवाल सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविलेला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री माननीय श्री.धनंजय मुंडे हे देखील या ठिकाणी उपस्थित आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने यासंदर्भात एक-दोन दिवसांमध्ये निर्देश दिल्यास पुढील आठवडयात या सर्व उमेदवारांना शासन सेवेमध्ये सामावून घेण्याबाबतचे अंतिम आदेश आम्ही निर्गमित करु शकू.

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.अमित देशमुख यांनी या प्रश्नाला अतिशय सकारात्मक उत्तर दिले आहे. हा प्रश्न वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचा आहे. परंतु लाड-पागे समितीचा संबंध पूर्णपणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी आहे. सफाई कामगारांसाठी ४२ वर्षांपूर्वी लाड-पागे समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशींनुसार राज्यातील महापालिका, नगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, इत्यादी ठिकाणी सफाई कामगारांच्या वारसांना सेवेमध्ये सामावून घेतले जाते. मंत्री महोदयांनी आता उल्लेख केल्याप्रमाणे मी सांगू इच्छितो की, दोन दिवसांमध्येच या प्रकरणी आपण बैठक घेऊन सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांचा प्रश्न निकाली काढू.

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना आणखी दोन प्रश्न विचारले होते. निवासी वैद्यकीय अधिकारी आणि सहाय्यक प्राध्यापक यांचे

ता.प्र.क्र.४१०२५.....

श्री.अमिन पटेल.....

काही प्रश्न प्रलंबित आहेत. मंत्री महोदयांना विनंती आहे की, कृपया हे दोन प्रश्न देखील सोडवावेत.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांनी आता निवासी वैद्यकीय अधिकारी व सहाय्यक प्राध्यापक यांच्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ते यासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. माझ्याबरोबर त्यांच्या अनेक बैठका झाल्या आहेत. तसेच अनेक वेळा त्यांनी पत्रव्यवहार देखील केला आहे व सभागृहामध्ये देखील हा मुद्दा अनेक वेळा उपस्थित केला आहे.

अध्यक्ष महोदय, या विषयाच्या अनुषंगाने आम्ही शासन स्तरावर अनेक बैठका घेतल्या. दुर्दैवाने हे वैद्यकीय अधिकारी राज्यभर आंदोलन करीत आहेत. सभागृहाच्या माध्यमातून माझी सर्व निवासी वैद्यकीय अधिकारी व सहाय्यक प्राध्यापक यांना विनंती आहे की, आपण आपले आंदोलन मागे घ्यावे. कारण वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी व रुग्ण सेवा यांच्यामध्ये यामुळे अनेक व्यत्यय येत आहेत. त्यामुळे त्यांनी मन मोठे करुन हे आंदोलन मागे घ्यावे व कामावर परत यावे.

अध्यक्ष महोदय, निवासी वैद्यकीय अधिकारी व सहाय्यक प्राध्यापक संवर्गाच्या अनेक मागण्या आहेत. त्यापैकी सुमारे ८० टक्के मागण्या शासनाने मान्य केल्या असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. परंतु त्यांना सेवेमध्ये कायम करण्यासह इतर ज्या मागण्या आहेत त्या अनुषंगाने पूर्वी सर्वोच्च न्यायालयाने काही निर्णय दिलेले आहेत व त्यामुळे तसे करण्यात अडचणी आहेत. अर्थात, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पुढे जाऊन निर्णय घेण्यामध्ये शासनाला काही अडचणी आहेत. त्यामुळे या गोष्टीचे भान राखूनच पावले उचलावी लागतील. निवासी वैद्यकीय अधिकारी व सहाय्यक प्राध्यापक यांनी कोरोना काळात कोविड योध्दे म्हणून केलेल्या कामाची आम्हाला जाणीव आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

ता.प्र.क्र.४१०२५...

श्री. अमित देशमुख...

त्यांचा आम्हाला आदर आहे, सन्मान आहे. त्यांना कोणताही धक्का लागणार नाही किंवा त्यांची हेळसांड होणार नाही, ही आमची भूमिका आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी जो स्पेसिफिक प्रश्न विचारला होता तो असिस्टंट प्रोफेसर आणि मेडिकल ऑफिसर यांच्या बाबतीत होता. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मेडिकल ऑफिसर यांच्या बाबतीत शासन स्तरावर चर्चा सुरू आहे. असिस्टंट प्रोफेसर यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या काही अडचणी आपल्यासमोर असल्यामुळे तूर्त आपल्याला त्या विषयावर निर्णय घेणे कठीण आहे, हे मला मुद्दाम या ठिकाणी सांगितले पाहिजे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, आताच माननीय सामाजिक न्याय मंत्री यांनी सांगितले की, लाड-पागे समितीने वारसा हक्काने देण्यात येणाऱ्या नियुक्तीबाबत कोणत्या शिफारशी केल्या आहेत आणि त्यासंबंधी दिनांक ११.३.२०१६ रोजीच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयातील अनुक्रमांक ३ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार केवळ अनुसूचित जातीमधील सफाई कामगारांच्या वारस किंवा नातेवाईकांना सदरहू योजनेचा लाभ देण्यात यावा, असे स्पष्ट नमूद असल्याने इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना किंवा नातेवाईकांना या योजनेचा लाभ देण्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे. कारण आपण हा निर्णय घेतलेला आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, अनुसूचित जाती वगळता इतर जाती प्रवर्गातील किती उमेदवारांनी शासनाकडे अर्ज सादर केले आहेत.

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न जे.जे. महाविद्यालयातील अनुकंपा तत्वावरील किंवा लाड-पागे समितीच्या शिफारशीवर वारसाहक्काने नोकरी देण्याबाबतचा विषय आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी जो प्रश्न उपस्थित केल त्यामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, सन २०१८ साली एक शासन निर्णय असा निर्गमित झाला होता की, ज्यामध्ये फक्त नवबौध्द असणाऱ्यांनाच लाड-पागे समितीच्या वारसाच्या शिफारशी करता येतील, इतरांना नाही. त्या शासन

ता.प्र.क्र.४१०२५...

श्री. धनंजय मुंडे...

निर्णयामध्ये आपण आता दुरुस्ती करीत आहोत. येत्या ८-१० दिवसांमध्ये तो सुधारित शासन निर्णय निर्गमित करुन सफाई कामगार कोणत्या जातीचा आहे, धर्माचा आहे यापेक्षा लाड-पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे त्यांना वारसाहक्क दिला गेला पाहिजे, ही सरकारची भूमिका आहे आणि त्या भूमिकेतूनच सामाजिक न्याय विभाग लवकरात लवकर या सफाई कामगारांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार नोकऱ्या देईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या संख्येबाबत विचारणा केली आहे. ती संख्या आता माझ्याकडे नाही. मूळात हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाचा नव्हता. तो वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित आहे. परंतु त्याचा जो आकडा असेल तो मी पटलावर ठेवतो.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन २०१६ च्या शासन निर्णयाच्या बाबतीत कोणता निर्णय घेतला, त्याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी संख्येच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबद्दल मी त्यांना सांगू इच्छितो की, एकूण ५८ उमेदवार या निर्णयामुळे बाधित होत आहेत. त्यापैकी काही उमेदवारांसंबंधी या लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या निर्णयाच्या अधिन राहून अंतिम कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या ५८ पैकी ५१ उमेदवार पात्र आहेत. ७ उमेदवारांची वयोमर्यादा संपलेली आहे. शासकीय सेवेत रुजू होण्यासाठी ते एज-बार झालेले आहेत. पण ते एज-बार झाले असले तरी शासनास हे अहवाल प्राप्त होण्यास जी दिरंगाई झाली त्या कारणामुळे ते एज-बार झाले आहेत. त्यामुळे त्यांनाही आम्ही विशेष बाब म्हणून सेवेत सामावून घेण्यासाठी शासन अंतिम आदेश जारी करणार आहे.

अप्रकाशित प्रत

ता.प्र.क्र.४१०२५...

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांच्या बाबतीतही निर्णय घ्यावा.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, याबाबत शासनाने वेळोवेळी निर्णय घेतले आहेत आणि त्या उमेदवारांच्या वारसांच्या नातेवाईकांच्या बाबतीत नियुक्ती देताना शासन सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करेल.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१०२५....

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार माननीय मंत्री म्हणतात त्याप्रमाणे ५८ पैकी ५१ जण पात्र होतात आणि ७ जण वयोमर्यादा वाढल्यामुळे टाईमबार झाले आहेत. माननीय मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, लाड पागे समितीच्या शिफारशी टाईमबार झाल्या आहेत. ज्याकाळी ही समिति केली असेल त्याकाळची सामाजिक रचना आणि त्यामध्ये येणारे त्या त्या समाजाचे लोक यामध्ये खूप फरक पडला आहे. अध्यक्ष महोदय, आपल्या माध्यमातून मला शासनाला पहिला प्रश्न असा विचारायचा आहे की, लाड पागे समितीच्या शिफारशीवर पुनर्विचार करण्यासाठी सरकार नवीन समितीची स्थापना करणार काय आणि करणार असेल तर किती दिवसात करणार आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, एकेकाळी आणि आजही तिथे वारसा हक्काने जे कर्मचारी नोकरीसाठी अर्ज करतात ते केवळ रेसिडेन्टच्या जागेसाठी करतात. कारण त्यांना कुठेही राहण्यासाठी जागा नाही. त्यामुळे नोकरी गेली तर आपले घरही जाईल असे त्यांना वाटते. वडिलांची नोकरी गेली, आई-वडिल वारले किंवा रिटायर झाले तर त्यांना ते घर खाली करावे लागते. त्या मानाने ते बिचारे गरीब मेहतर समाजाचे असतील किंवा इतर समाजाचे लोक तिथे काम करतात. आता आपण ज्या टर्म्स ऑफ रेफरन्सच्या नवीन शिफारशी करणार आहात त्यामध्ये जे पदवीधर किंवा उच्च पदवीधर असतील अशी मुले अर्ज करतात. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना शासनाच्या दुसऱ्या विभागामध्ये ज्या ठिकाणी रिक्त जागा असतील तिथे त्यांना समाविष्ट करणे अशा टर्म्स ऑफ रेफरन्स आपण नवीन समितीला घालून देणार काय ?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, लाड पागे समितीच्या संदर्भात आताच्या पार्श्वभुमीवर आणखी एखादी समिति नेमणार काय असा सन्माननीय सदस्यांनी विचारलेला पहिला प्रश्न हा सामाजिक न्याय विभागाचा आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री त्या प्रश्नाचे उत्तर देतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य म्हणाले की, वारसा हक्काने मिळालेले आपले घर तिथून निघून जाऊ नये किंवा घराची अडचण होऊ नये म्हणून सुद्धा हे

ता.प्र.क्र. ४१०२५....

श्री. अमित देशमुख....

अर्ज येत असतात. त्यांच्या नैसर्गिक हक्कानुसार कोणी पात्र वारस असल्याकारणाने त्याला घर मिळणार असेल तर आपण त्याच्यावर अन्याय करणे उचित नाही. त्यामुळे एकंदरीत त्या कायद्याच्या कक्षेत बसून आपल्याला या गोष्टी कराव्या लागतील. त्याच्याच अधीन राहून आपण ही पाऊले उचलत आहोत.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. कारण आम्ही जेव्हा राजकारणात आलोही नव्हतो तेव्हापासून म्हणजे ४० वर्षापूर्वीची ही लाड पागे समिती आहे. त्या समितीची शिफारस आपण चालवत आहोत. त्याच शिफारशींना रिव्हिव करण्यासाठी आपण दुसरी एखादी समिती नेमणार काय आणि टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये त्यांच्या शिक्षणाप्रमाणे इतर विभागात सरकारी नोकरीमध्ये जिथे रिक्त जागा असतील तिथे त्यांना सामावून घेणार काय ? या संदर्भातील टर्म्स ऑफ रेफरन्स त्या समितीला देणार काय असा माझा प्रश्न आहे.

श्री. सुनिल प्रभू :अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांनी विचारलेल्या प्रश्नाला जोडूनच मला एक प्रश्न विचारायचा आहे. माननीय मंत्री श्री. अमित देशमुख व माननीय मंत्री श्री. धनंजय मुंडे यांचे सभागृहामध्ये मी मनापासून आभार व्यक्त करतो की, त्यांनी याबाबतचा निर्णय तात्काळ घेण्याचे मान्य केले आहे. प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांना मुळात हा प्रश्न विधानसभेमध्ये उपस्थित करण्याची वेळच का आली आहे ? लाड पागे समितीप्रमाणे चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांची भरती करणे योग्य असेल तर त्या समितीने निर्णयानुसार रितसर भरती होणे हे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, शासकीय रुग्णालय किंवा सरकारी दप्तर अशा प्रत्येक प्रशासनामध्ये सर्व बाबी त्या नियमानुसार करीत असतो. परंतु सन २०१८ मध्ये जो निर्णय झाला त्याबाबत माननीय मंत्र्यांना अधिक माहिती असेल तर त्यांनी त्याचा उल्लेख करावा. सन २०१८ मध्ये तत्कालीन सचिवांनी जो निर्णय घेतला त्यामुळे या सर्व बाबी पुढे प्रलंबित ठरल्या म्हणून मला असे वाटते की, तेव्हा जो निर्णय झाला त्याला जबाबदार

ता.प्र.क्र. ४१०२५....

श्री. सुनिल प्रभू.....

कोण आहे, त्यांनी तो निर्णय का घेतला आहे आणि निर्णयामुळे विलंब का झाला त्यावर सरकार कोणती कारवाई करणार आहे ? या बाबतीत माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी खुलासा करणे गरजेचे आहे. वारसाहक्क असणारी लोक नोकर भरतीपासून अलिप्त राहिली आहेत त्याला जबाबदार झारीतील शुक्राचार्य कोण आहेत, याची माहिती सभागृहाला कळणे आवश्यक आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१०२५.....

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री योगेश सागर, सुनील प्रभू यांनी या संबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. लाड-पागे समिती स्थापन होऊन, या समितीच्या शिफारशी स्वीकारुन आता जवळजवळ ४२ वर्षे झाली आहेत. ४२ वर्षांपूर्वी सफाई कामगारांची अवस्था वेगळी होती. आता २१ व्या शतकातील त्यांची अवस्था वेगळी आहे हे कोणाला सांगण्याची गरज नाही. सरकार म्हणून या विभागाचा मंत्री म्हणून मी सांगू इच्छितो की, येणाऱ्या काळात लाड -पागे समितीच्या ४२ वर्षांपूर्वीच्या शिफारशीसह नवीन समिती गठीत करण्याचा विचार सरकारला करावा लागणार आहे. दुसरा महत्त्वाचा विषय असा आहे की,सन २०१८ पर्यंत सफाई कामगारांना लाड -पागे समितीचा योग्य तो अधिकार मिळत होता. सन २०१८ मध्ये तत्कालीन सचिवांनी एक जी.आर असा काढला व त्यामध्ये चार ओळी नमूद केल्या की, लाड- पागे समितीच्या शिफारशी या नवबौध्द मागासवर्गीय सफाई कामगारांनाच मिळतील. हा भाग सोडून इतर समाजाचे अनेक लोक सफाईचे काम करतात. वाल्मिकी समाज, मेहतर समाज यांना सन २०१८ च्या निर्णयामुळे लाभ मिळू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मधल्या काळात हा विषय समोर आल्यानंतर ७-८ बैठका घेतल्या. सन २०१८ च्या निर्णयासंबंधी सरकार पुनर्विचार करीत आहे. शासन निर्णय दुरुस्त झाल्यानंतर या सदनात उपस्थित केलेले सर्व प्रश्न सुटतील, असा मला विश्वास आहे.

श्री. राहुल पाटील : अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडीचे माननीय मुख्यमंत्री यांचे मी या ठिकाणी मन:पूर्वक अभिनंदन करतो. त्यांनी परभणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ६५० कोटी रुपये मंजूर केले. माननीय मंत्री श्री. अमित देशमुख, माननीय उप मुख्यमंत्री व महाविकास आघाडीतील सर्व मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. माझे ३ स्पेसिफिक प्रश्न आहेत. सध्या अनुकंपा तत्त्वावर भरती सुरु आहे. यामध्ये प्रत्येक विभागात २० टक्के भरती करण्यात यावी, असे शासन आदेश असताना देखील त्या विभागात भरती होत नाही. भरती करण्यासंबंधी

ता.प्र.क्र. ४१०२५.....

श्री. राहुल पाटील....

शासनाकडून काही टाईम बाऊंड कार्यक्रम केला जाणार आहे काय ? तत्कालीन मुख्यमंत्री माननीय स्व. विलासराव देशमुख यांनी स्पेशल ड्राईव्ह घेतला होता. अनुकंपा तत्त्वावर जेवढे लोक असतील त्यांची या माध्यमातून भरती करण्यात आली होती.

**उपाध्यक्ष :** या ठिकाणी जे.जे. रुग्णालयासंबंधी प्रश्न विचारण्यात आलेला आहे.

श्री. राहुल पाटील : अध्यक्ष महोदय, हा राज्याचा प्रश्न आहे. माझे ऐकून घ्यावे. सफाई कामगारांच्या संबंधी प्रश्न आहे. परभणी येथील सिव्हिल रुग्णालयात भरती होत नाही. एक वर्षामध्ये त्यांनी अर्ज केला पाहिजे. एक वर्षात जर त्यांनी अर्ज केला नाही तर त्यांना अपात्र ठरवले जाते. ही अट शिथिल करणार काय ? शासनाने ४५ वर्षापर्यंत वयाची अट निश्चित केलेली आहे. त्यामध्ये शिथिलता आणली जाणार आहे काय ? असे दोन प्रश्न आहेत. एक वर्षामध्ये अर्ज केला नाही तर त्यांना अपात्र केले जाते. त्यांना मॅट मध्ये जावे लागते व तेथून ऑर्डर आणावी लागते . माझी विनंती आहे की, वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांच्या मृत्यू नंतर त्यांच्या नातेवाईकांची अनुकंपा तत्त्वावर भरती केली जाते. याकरिता ही अट शिथील केली जाणार आहे काय तसेच ४५ वर्षांच्या वयाची अट शिथील केली जाणार काय ?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राहुल पाटील यांनी परभणी जिल्हा रुग्णालयाच्या संबंधी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. आरोग्य विभागाशी हा विषय संबंधित आहे. वैद्यकीय शिक्षण विभागातील सफाई कामगार व कंत्राटी कामगार बाबत मुद्दा आहे. सामान्य प्रशासन विभाग या संबंधी अंतिम मार्गदर्शन करीत असते.

यानंतर श्रीमती गिरप...

ता.प्र.क्र. ४१०२५ ...

श्री.अमित देशमुख ...

त्याचे काही रिक्रुटमेंट रुल्स विभागाने तयार केलेले आहेत. त्या रिक्रुटमेंट रुल्सना देखील काही कायदेशीर बंधने आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, त्या चौकटीमध्ये या सर्व बाबी आपल्याला कराव्या लागतील. सन्माननीय सदस्यांच्या काही विशेष सूचना असतील तर त्यांच्या समवेत चर्चा करुन त्यावर आपल्याला काय पावले उचलता येतील या संदर्भात एक बैठक आयोजित करुन त्यावर मार्ग काढता येईल.

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय मंत्री यांनी या प्रश्नावर उत्तर दिलेले आहे. तत्कालीन सचिवांनी निर्णय घेतल्यामुळे सन २०१८ नंतर वाल्मिकी व बुनकर समाजावर अन्याय झाला आणि नोकरीमध्ये अनुशेष राहिला. आज समाज कल्याण मंत्री महोदयांनी हा निर्णय घेतल्यानंतर जो अनुशेष राहिला आहे, तो भरण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे, असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी पुन्हा एक प्रश्न उपस्थित केला आहे की, सन २०१८ च्या शासन निर्णयामुळे इतर समाजाला लाड पागे समितीच्या शिफारशीचा फायदा मिळालेला नाही. त्या सन २०१८ च्या शासन निर्णयामध्ये आता सुधारणा केली जात आहे. मला विश्वास आहे की, ती सुधारणा झाल्यानंतर सफाई कामगारांसाठी सर्वंकष धोरण शासन आणत आहे. ते धोरण मी लवकरच माननीय मंत्रिमंडळासमोर ठेवतो. या १५ दिवसांमध्ये हे धोरण माननीय मंत्रिमंडळासमोर जाईल. मला विश्वास आहे की, त्यांच्या समोर हे धोरण गेल्यानंतर सन २०१८ च्या शासन निर्णयामध्ये जो नवबौध्द, मागासवर्गीय सफाई कामगार असा उल्लेख करण्यात आलेला आहे, त्याच्या ऐवजी सफाई कामगार म्हणून कोणत्याही जातीचा, कोणत्याही धर्माचा जो कोणी सफाई कामगार म्हणून काम करीत असेल त्या सर्वांना या शिफारशीचा फायदा होईल, याची खात्री मी आपल्या समोर देत आहे.

ता.प्र.क्र. ४१०२५ ...

श्री.धनंजय मुंडे...

अध्यक्ष महोदय, सन २०१८ च्या निर्णयामुळे इतर समाजाच्या काही जणांना त्या शिफारशीचा फायदा झाला नाही. त्यामुळे आता प्रत्येकाच्याच मनात शंका आहे. सन २०१८ च्या अगोदर किंवा सन २०१८ च्या नंतरच्या काळात ज्यांना मिळायला पाहिजे होते ते सन २०१८ च्या निर्णयाने मिळाले नाही, त्यांना सुध्दा मिळेल अशा पध्दतीचे सर्वंकष धोरण राज्य सरकार आणणार आहे.

...........

असुधारित प्रत

## सडे (ता.पोलादपूर, जि. रायगड) येथील कांगोरा मंदिरा समोर सभामंडप बांधणे व गड किल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान मिळण्याबाबत

**(२) * ३९८९१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडे (ता. पोलादपूर, जि. रायगड) याठिकाणी शिवकालीन ऐतिहासिक कांगोरीगड/मंगळगड असून व तेथे ऐतिहासिक शिवकालिन कांगोरी मंदिर तेथे असून अनेक ऐतिहासिक वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सर्वांगीण विकासासाठी ऐतिहासिक किल्ले कांगोरा मंदिर समोर सभामंडप (शेड) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.वित्त, मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांगोरी मंदिर व तेथे कोरीव नक्षिकाम केलेले ८ पाण्याचे तलाव पाहण्याकरिता इतिहास संशोधक ,शाळा, महाविद्यालये तसेच सामाजिक संघटना यांच्या सहली सतत गडावर येत असून या गडाचे जतन व संवर्धन व सांस्कृतिक कार्यक्रम गेली ४५ वर्ष कांगोरीगड /मंगळगड संवर्धन समितीच्या वतीने केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समितीसुध्दा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सर्वांगीण विकासासाठी ऐतिहासिक किल्ले कांगोरी मंदिर समोर सभामंडप (शेड ) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान मिळणेबाबत संबंधित विभागाकडे सातत्याने मागणी करीत आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कांगोरा मंदिर समोर सभामंडप (शेड) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९८९१...

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) होय. हे खरे आहे.

कांगोरी किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहे. हा किल्ला बहुतांशी उध्वस्त झाला असून फक्त तटबंदी शाबूत आहे. तटबंदीच्या आत मंदिराचे अवशेष आणि दगडी कुंड आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) व (५) कांगोरी गड/ मंगळ गड संवर्धन समितीने दि.११.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सर्वांगीण विकासासाठी ऐतिहासिक कांगोरा मंदिर समोर सभामंडप (शेड) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धनासाठी व सांस्कृतिक कार्यासाठी अनुदान मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत संबधित यंत्रणेस कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न गड किल्ल्यांच्या अनुदाना संबंधीचा आहे. कांगोरी गड, मंगळ गड संवर्धन समितीने पत्र दिले होते. त्या अनुषंगाने माझे मंत्री महोदयांना ३ प्रश्न आहेत. काही गड किल्ले हे केंद्र सरकारच्या अखत्यारित आहेत. काही गड किल्ले हे राज्याच्या पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आहेत. परंतु, अनेक गड किल्ले हे पुरातत्व विभागामध्ये नोंदलेले नाहीत. अशा गड किल्ल्यांचे देखील संवर्धन व्हावे. कारण गड किल्ले हे आपले प्रेरणास्त्रोत आहेत. या राज्यातील असंख्य शिवभक्त व अनेक संस्था हे गड किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम करीत असतात. मी स्वत: सह्याद्री प्रतिष्ठानचा प्रतिनिधी आहे. मंत्री महोदयांना मी या संदर्भात अनेकवेळेस पत्र देखील दिलेली आहेत.

ता.प्र.क्र. ३९८९१...

श्री.संजय केळकर ...

अध्यक्ष महोदय, जे मान्यताप्राप्त गड किल्ले नाहीत त्यांचे संवर्धन करण्याकरिता तत्कालीन माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने लोक वर्गणीतून हे गड संवर्धन करता येईल अशा प्रकारचा जी.आर. काढला होता. त्या अनुषंगाने गड किल्ले संवर्धन करणाऱ्या शिवभक्तांनी अनेक गड किल्ले... आमच्या संस्थेने जवळजवळ २० गड किल्ल्यांवर तोफ गाडे बसविले. महाद्वारे बसविली. प्रतापगडाची एक बाजू खचल्यावर जवळजवळ ३० लाख रुपये लोकांकडून जमा करुन पुरातत्व विभागाची आणि त्याचे मालकी हक्क ज्या महाराजांकडे आहेत त्यांची परवानगी घेऊन त्याची डागडुजी केली. पुरातत्व विभाग हे गड संवर्धन करीत असताना त्याकरिता परवानगी देण्याकरिता खूप डिले करते. कारण वन खात्याची, पुरातत्व विभागाची परवानगी घ्यायची असते. आजही माझ्याकडे सह्याद्री प्रतिष्ठानची ५-१५ पत्रे आहेत. त्यांना पुरातत्व खात्याने ६-६ महिने परवानग्या दिलेल्या नाहीत.

नंतर श्री.शिंदे ...

ता.प्र.क्र.३९८९१...

श्री.संजय केळकर...

पुरातत्व विभागाने ६-६ महिने परवानगी दिलेली नाही. यासंबंधी पुढाकार घेऊन कालमर्यादा निश्चित करुन कार्यक्रम देण्यात यावा. काही वेळा जाणीवपूर्वक परवानगी दिली जात नाही. कांगोरीगड/मंगळगडासाठी संबंधित खात्याला अनुदान दिले आहे. आणखी काही गड आहे जे खऱ्या अर्थाने आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांना अनुदान देण्यासंबंधिचे धोरण जाहीर करण्यात येईल काय ? गड व किल्ले ही आपली मंदिरे आहेत. त्यांचे पावित्र्य राखत असताना त्यांच्या भोवती राहणाऱ्या गावातील दुर्ग संवर्धक यांना दुर्ग संरक्षक म्हणून नेमण्यात येईल काय, त्यासंबंधी बैठक आयोजित करण्यात येईल काय ?

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, काही गड व किल्ले यांच्या संदर्भात योजना आहे काय, याबाबत सन्माननीय सदस्य यांनी विचारणा केली आहे. आपल्या राज्यात काही गड किल्ले केंद्र शासनाकडून संरक्षित केले जातात व काही राज्य शासनाकडून संरक्षित केले जातात. काही पुरातत्व, वास्तू, शिल्प, गड व किल्ले संरक्षित नाहीत. त्यासंबंधी राज्य पुरातत्व विभाग वेळोवेळी कार्यवाही करीत असते व त्यांना दर्जा देण्याचे काम करीत असते. या क्षेत्रात काही स्वयंसेवी संस्था काम करतात. सन्माननीय सदस्य यांनी सांगितले की त्यांचीही एक संस्था आहे. अशा संस्थांना केंद्र व राज्य शासनाच्या दत्तक योजनेंतर्गत गड व किल्ले संवर्धनासाठी देण्यात येतात. त्यापूर्वी शासन नियमांना अधीन राहून शहानिशा करण्यात येते. परवानगीसाठी ६ महिने ते १ वर्षाचा कालावधी लागतो, असे सन्माननीय सदस्य यांनी सांगितले ही बाब खरी आहे. पुरातत्व विभागाकडे विहीत नमुन्यात एखादा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो परिपूर्ण असेल तर ४५ ते ९० दिवसांच्या कालावधीत परवानगी देण्याकरिता नवीन नियम करता येईल काय, याबाबत विचार करण्यात येईल. या सर्व कामांसाठी निधी कसा उपलब्ध करुन देण्यात येईल, याबाबत सन्माननीय सदस्य यांनी विचारणा केली आहे. गड, किल्ले, पुरातत्व वास्तु, मंदिरे, शिल्प यांच्या संवर्धनासाठी खूप अधिक निधीची आवश्यकता असते. महाविकास आघाडी सरकार

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९८९१...

श्री.अमित देशमुख...

सत्तेत आल्यापासून गड व किल्ल्यांसाठी भरीव निधी देण्याची तरतूद किंवा भूमिका घेतली आहे. राज्यातील काही गड व किल्ले यांना पायलट बेसिसवर निधी देण्याचे काम प्रथमच केले आहे. उदाहणार्थ – पुरातत्व विभागामार्फत जिजामाता समाधी, जिजामाता वाडा, रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित अनेक किल्ले, स्मारके, पुरातत्व वास्तू व मंदिरांना निधी देण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. त्याकरिता अर्थसंकल्पामध्ये आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे. यासाठी सीएसआरमधूनही निधी उपलब्ध करुन देता येऊ शकतो. काही संस्था या कामांसाठी दान देत असतात. अशा निरनिराळ्या प्रकारे निधी उपलब्ध करावा लागेल. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून एखादी योजना तयार करावी लागेल. त्यामाध्यमातून केंद्र शासनाचा हिस्सा व राज्य शासनाचा हिस्सा या कामांसाठी उपलब्ध करुन देता आला तर त्यासाठी काम करण्यात येईल.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, आताच मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे राज्य शासनाने सिंधुदुर्ग व विजयदुर्ग किल्ला दुरुस्तीसाठी प्रायोगिक तत्त्वावर घेतलेले आहेत. सीएसआर, पर्यटन विभाग, आमदार किंवा नियोजन विभागाचा निधी उपलब्ध असून देखील केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाची परवानगी नसल्यामुळे सदर किल्ल्यावर खर्च करता येत नाही. त्यामुळे मागील दोन वर्षांपासून राज्य शासनास कोणताही खर्च करता आला नाही.

अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, सदर किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी निधी खर्च करु देण्याबाबत राज्य शासन केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागास विनंती करणार आहे का किंवा त्यांच्याकडून तशी परवानगी घेणार आहे काय?

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मी आताच सांगितले आहे की, राज्यातील काही किल्ले केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे आहेत. त्यामुळे भारतीय पुरातत्त्व विभागाने किल्ल्यांचा आराखडा तयार केला असेल आणि त्या आराखड्यामध्ये काही राज्यातील काही किल्ल्यांचा समावेश केला असेल तर सदर समावेश केलेल्या किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी केंद्र सरकारकडून देखील निधी उपलब्ध करुन दिला जातो. तसेच सदर किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी राज्य शासनामार्फत देखील निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. भारतीय पुरातत्त्व विभागांतर्गत येत असलेल्या किल्ल्यांवर राज्य शासनास कोणतेही अधिकार नाहीत. मागील काही दिवसांपर्वूीच औरंगाबाद येथील भारतीय पुरातत्त्व विभागाच्या कार्यालयामध्ये जाऊन एक बैठक घेतली होती. अशा प्रकारच्या अनेक प्रकल्पांमध्ये भारतीय पुरातत्त्व विभाग व महाराष्ट्र राज्याचे पुरातत्त्व विभाग एकत्र काम करीत आहे. राज्यातील काही अडचणीमुळे भारतीय पुरातत्त्व विभागाकडे काही कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे पुरातत्त्व आणि गडकिल्ले संवर्धनासंदर्भात अनेक राज्यांमध्ये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित करण्यात आलेली आहे. तशीच समिती या राज्यामध्ये देखील घटित करण्याचा विचार राज्य शासन करीत आहे. सदर समिती घटित करण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांकडे आग्रहाची भूमिका मांडण्यात येईल. त्यांनी अंतिम मान्यता दिल्यानंतर सदरहू सर्व कामांना अधिक गती प्राप्त होईल.

असुधारित प्रत

ॲड.आशिष जयस्वाल : अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये काही भारतीय पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारके आहेत तर काही राज्य शासनाकडे असलेले संरक्षित स्मारक आहेत. राज्यातील संरक्षित स्मारकांची दुरुस्ती राज्य शासन मोठ्या प्रमाणावर करीत आहे. परंतु दुर्दैवाने भारतीय पुरातत्त्व विभागाने प्रत्येक ठिकाणी बोर्ड लावून ठेवले आहेत. १०० मीटर प्रतिबंधित क्षेत्र, ३०० मीटर रेग्युलेटरी क्षेत्र अशा प्रकारच्या नोटिसा लावण्यात आलेल्या आहेत. खरे पाहता आपल्या सांस्कृतिक वारसाकडे राज्य शासनाचे प्रचंड दुर्लक्ष होत आहे. ज्यांच्या मनात आले तो त्यापद्धतीने काम करीत आहे. थोडक्यात तेथे अवैध पद्धतीने बांधकाम केले जात आहे. सदर काम करण्यासाठी केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाची परवागनी घेणे आवश्यक आहे. परंतु कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता आपापल्या श्रद्धेनुसार बांधकाम केले जात आहे. त्यामुळे तेथील पुरातत्त्व वास्तुचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामामुळे सदर वास्तुंचे व्हॅल्यू कमी होत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व संरक्षित स्मारकांचे जतन व दुरुस्तीशिवाय तेथील सुरक्षा खूप महत्त्वाची आहे. स्थानिक स्वराज्य संस्था याकडे लक्ष देत नाहीत. राज्य शासन देखील त्याकडे विशेष लक्ष देत नाही. कालांतराने त्या वास्तुंचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होते. त्यामुळे माझी विनंती अशी आहे की, त्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यासह अशा सर्व ठिकाणी राज्य शासन सुरक्षा रक्षक नेमणार आहे काय?

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक महत्त्वाची सूचना केली आहे. गडकिल्ल्यांची सुरक्षा ही तितकीच महत्त्वाची आहे. पुरातत्त्व विभागाला मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने मंजुरी देखील दिलेली आहे. गडकिल्ल्यांची, वास्तुंची व शिल्पांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी शासनाचे मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्यामुळे आवश्यक ठिकाणी कंत्राटीपद्धतीने सुरक्षा व्यवस्था पुरवण्याबाबत शासन विचार करीत आहे. महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महामंडळ हे महाराष्ट्र पोलीस दलाचाच एक भाग आहे. सदर ठिकाणी सुरक्षा पुरविण्याठी सदर महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महामंडळाकडे मागणी केली आहे. उक्त मागणीनुसार जेव्हा मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येईल,

श्री.अमित देशमुख......

तेव्हा याकडे जातीने लक्ष घालून राज्यातील सर्व गडकिल्ल्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी राज्य शासन व पुरातत्त्व विभागाकडून तत्परतेने पावले उचलण्यात येतील.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९८९१.....

श्री. योगेश कदम : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न सडे, ता. पोलादपूर, जि. रायगड येथील असला तरी या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे. महाराष्ट्र राज्यातील काही किल्ले भारतीय पुरातत्त्व विभागाकडे आहेत आणि काही किल्ले हे राज्य पुरातत्त्व विभागाकडे आहेत. तसेच काही किल्ले हे पर्यटन विभागाकडे आहेत. सभागृहात माननीय पर्यटन मंत्री आणि माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री उपस्थित आहेत. पर्यटन विभागाकडे असलेल्या किल्ल्यांवर काम करण्यासाठी काही मर्यादा आहेत. तेथे पर्यटन विभागाला तटबंदी किंवा सांस्कृतिक कार्य विभागाकडील कामे करता येत नाहीत. पर्यटन विभागावर काही मर्यादा असल्यामुळे त्या विभागाकडून किल्ल्यावर केवळ पार्किंग सुविधा किंवा पर्यटकांसाठी इतर सुविधा निर्माण करण्याकरिता निधी खर्च केला जातो. माझा या निमित्ताने एक प्रश्न आहे. पर्यटन विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागास एकत्र येऊन पर्यटन विभागाकडील किल्ल्यांचे संवर्धन करता येईल काय ? दोन्ही विभागांना एकत्र येऊन एकत्रित निधी खर्च करता येईल काय ?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, सांस्कृतिक कार्य विभाग आणि पर्यटन विभाग एकच आहे. त्यामुळे याबाबत कोणतीही अडचण येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक एखादा गड, किल्ला जो की, पर्यटन विभागाच्या आखत्यारित आहे, त्याबाबत माहिती द्यावी. त्याबाबत एक बैठक आयोजित करुन त्यावर चर्चा करु व त्यातून मार्ग काढू, असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय अतिशय सकारात्मक उत्तर देत आहेत. काही दिवसांपूर्वी रायगड किल्ल्यावर एक अनधिकृत बांधकाम झाले होते. त्याबाबत लोकांनी आक्षेप घेतल्यानंतर ते बांधकाम तोडले गेले. मागील वर्षात ऐतिहासिक परंपरा असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य वारसा सांगणाऱ्या गड किल्ल्यांवर वेगवेगळी बांधकामे केली जात आहेत. काही ठिकाणी मजार बांधली जात आहे. काही ठिकाणी ऊरुसाचे आयोजन केले जात आहे. त्यामुळे शासन याबाबत तातडीने दखल घेणार आहे काय व अशा घटनांवर पायबंद घालणार

ता.प्र.क्र.३९८९१.....

श्री. अतुल भातखळकर....

आहे काय ? तसेच अशा गोष्टी करण्याचा जे कोणी प्रयत्न करीत आहेत, त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ? तिसरी बाब अशी की, मंत्री महोदयांनी सांगितले की, केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या समन्वयातून गड, किल्ल्यांचा विकास करु. मी मंत्री महोदयांना यानिमित्ताने विचारु इच्छितो की, याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहे काय ? नसल्यास, तो कधीपर्यंत पाठविला जाईल ?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, रायगडावरील तो प्रकार अनुचित होता. राज्य शासनाने त्याची तातडीने दखल घेऊन कारवाई केली आहे. असे प्रकार पुढील काळात घडू नयेत, याकरिता गड, किल्ल्यांची सुरक्षा व्यवस्था करणे अनिवार्य आहे. मी मघाशीच याबाबत सांगितले की, गृह विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र सुरक्षा दलास याबाबत विचारणा केली आहे. त्यांच्यामार्फत सर्वच गड, किल्ल्यांवर सुरक्षा व्यवस्था केली जाणार आहे. विशेषत: रायगड किल्ल्यास फोर्ट ऑफ कॅपिटल म्हटले जाते. त्यामुळे या किल्ल्यास विशेष महत्त्व आहे. या किल्ल्याच्या विशेष सुरक्षेकरिता काही पाऊले उचलली जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी कार्यवाहीबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, शासनाने याची दखल घेतली आहे आणि कायदेशीर कारवाई सुरु आहे. नियमानुसार जी काही कार्यवाही करणे आवश्यक असेल ती करण्यात येईल. केंद्र सरकार आणि राज्य सरकारची अशी काही योजना नाही. शासनाच्या शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पर्यटन विभाग या विभागांमध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा एकत्र सहभाग असतो. त्यामुळे केंद्रीय सांस्कृतिक मंत्री महोदयांची भेट घेऊन त्यांच्याकडे मी मागणी करणार आहे.

यानंतर श्री. चौधरी....

ता.प्र.क्र.३९८९१.....

श्री.अमित देशमुख.....

त्यामुळे माननीय सांस्कृतिक मंत्री, भारत सरकार यांची भेट घेऊन मी महाराष्ट्र राज्याच्या वतीने त्यांच्याकडे मागणी नोंदवणार आहे की, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि राज्य सरकारचा सांस्कृतिक कार्य विभाग यांच्यामार्फत गडकिल्ले, पुरातत्त्व वास्तू, गडकिल्ले यांच्यासंदर्भात एकत्रित योजना राबविणे शक्य असल्यास तसे करावे. असे झाल्यास निधी अभावी किंवा परवानगी अभावी रखडली जाणारी बरीचशी कामे संयुक्त विद्यमाने येणाऱ्या काळात मार्गी लागतील. महाराष्ट्र राज्याचा सांस्कृतिक कार्य विभाग या नात्याने केंद्र सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे आम्ही यासंदर्भातील प्रस्ताव येत्या काळात सादर करणार आहोत.

---------

असुधारित प्रत

## पायरवाडी (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे आरोग्य सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३) * ४०५५४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पायरवाडी (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील ६ वर्षीय मुलाचा मृतदेह ३५ ते ४० कि.मी. अंतरावरील त्या गावात नेण्यासाठी पैशांअभावी शासकीय दवाखान्यातील रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने मृतदेह बाइकवरुन न्यावा लागल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोन कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी समितीव्दारे सुरु असून चौकशीच्या अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्यासह ग्रामीण भागातील सरकारी रुग्णालयाची परिस्थिती सुधारण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२), (३) व (४) रुग्णवाहिकेतून मृतदेह वाहून नेण्याचे प्रावधान नाही. मृतदेह वाहतुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शववाहिका उपलब्ध असतात. तथापि मयत रुग्णाच्या नातेवाईकांनी केलेल्या तक्रारी अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक, पालघर यांनी चौकशी अधिकारी नेमून सदर प्रकरणी चौकशी सुरु केली आहे. कार्यरत असलेले रुग्णवाहिका चालक हे जे.एस.एस.के अंतर्गत कंत्राटी शकॉम मेडिया इंडिया प्रा.लि. भोपाळ या संस्थेमार्फत पुरविण्यात आलेले आहेत. सदरील वाहन चालकांच्या जागी तात्काळ तीन वाहनचालक

असुधारित प्रत

**ता.प्र.क्र.४०५५४.....**

**श्री. राजेश टोपे.....**

उपलब्ध करुन देण्याविषयी ऐशकॉम मेडिया इंडिया प्रा.लि. भोपाळ यांना कळविण्यात आले आहे.

मोखाडा तालुक्यात ग्रामीण रुग्णालय मोखाडा, उपजिल्हा रुग्णालय जव्हार आणि ०४ प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. यावर्षी ता.मोखाडा ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी नवीन रुग्णवाहिका देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४०५५४.....

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, मोखाडा, जि.पालघर येथे अतिशय हृदयविदारक घटना घडलेली आहे. सहा वर्षांच्या मुलाचा मृतदेह रुग्णवाहिका किंवा शववाहिकेद्वारे गावामध्ये नेण्याकरिता पैसे नसल्याने बाईकवरुन नेण्यात आला. मंत्री महोदयांनी उत्तराच्या पहिल्याच ओळीमध्ये नमूद केले आहे की, "रुग्णवाहिकेतून मृतदेह वाहून नेण्याचे प्रावधान नाही." परंतु हे उत्तर अतिशय टेक्निकल आहे, असे मला वाटते. रुग्णवाहिकेतून मृतदेह नेण्याचे प्रावधान नाही परंतु ज्या ठिकाणी शववाहिका किंवा hearse उपलब्ध नसते त्या ठिकाणी मृतदेह वाहून नेण्यासाठी रुग्णवाहिकेचा वापर केल्याचे आपण अनेक वेळा पाहतो. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असेही नमूद केले आहे की, "मृतदेह वाहतुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शववाहिका उपलब्ध असतात. तथापि, मयत रुग्णाच्या नातेवाईकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक, पालघर यांनी चौकशी अधिकारी नेमून सदर प्रकरणी चौकशी सुरु केली आहे." माझा प्रश्न असा आहे की, जर स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शववाहिका उपलब्ध असतात तर त्या ठिकाणी, त्या वेळी शववाहिका का उपलब्ध नव्हती ?

अध्यक्ष महोदय, ऐशकॉम मेडिया इंडिया प्रा.लि., भोपाळ या मध्य प्रदेशातील कंपनीला रुग्णवाहिकांचे कंत्राट देण्यात आलेले आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, "सदरील वाहन चालकांच्या जागी तात्काळ तीन वाहनचालक उपलब्ध करुन देण्याविषयी ऐशकॉम मेडिया इंडिया प्रा.लि. भोपाळ यांना कळविण्यात आले आहे." परंतु माझा प्रश्न असा आहे की, अशी घटना घडल्यामुळे ज्या कंपनीला रुग्णवाहिकांचे कंत्राट दिले आहे त्यांचे कंत्राट रद्द करणार का ?

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना दोन स्पेसिफिक प्रश्न विचारलेले आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, सदर ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेची शववाहिका का उपलब्ध नव्हती ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, रुग्णवाहिका वाहून नेण्याचे कंत्राट दिलेल्या कंपनीचे कंत्राट रद्द करणार का ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४०५५४.....

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, खरे तर सन्माननीय सदस्यांनी ज्या घटनेच्या अनुषंगाने हा प्रश्न उपस्थित केला आहे अशी घटनाच घडायला नको होती. परंतु मी या निमित्ताने सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, रुग्णवाहिका ही शववाहिनी नाही. रुग्णवाहिकेचा वापर रुग्ण वाहून नेण्यासाठी केला जातो. तसेच शववाहिकेची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असते. महानगरपालिका, नगरपालिका यांनी स्वत:ची शववाहिका ठेवली पाहिजे व ती त्यांची जबाबदारी आहे. असे असले तरीही हे राज्याचे सार्वभौम सभागृह आहे व या सभागृहामध्ये सर्व प्रश्न सुटलेच पाहिजेत. केवळ वेळ मारुन नेण्याचा मानस महाविकास आघाडी सरकारचा किंवा माझाही नाही. त्यामुळे या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री माननीय श्री.अजित पवार व माननीय नगरविकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्याशी मी चर्चा केली आहे. विधान परिषद सभागृहामध्ये देखील हा विषय आला होता. यासंदर्भात दोन्ही मंत्री महोदयांनी विश्वासाने सांगितले आहे की, हा प्रश्न सुटलाच पाहिजे व सर्व महापालिका आणि नगरपालिकांमध्ये कुठल्याही परिस्थितीत शववाहिनी असलीच पाहिजे. ज्या ठिकाणी शववाहिनी नसेल तेथे जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून खरेदी केली जाईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४०५५४...

श्री. राजेश टोपे...

मी या ठिकाणी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला जी अनुज्ञेय यादी दिलेली आहे त्यानुसार आपण ॲम्बुलन्सेस खरेदी करु शकतो आणि शववाहिनी सुध्दा खरेदी करु शकतो. त्यामुळे ज्या सन्माननीय सदस्यांच्या मतदार संघामध्ये अशी शववाहिनी उपलब्ध नसेल त्यांनी त्यासाठी मदत करावी. ती शववाहिनी डीपीसीमधून सुध्दा घेतली जाईल आणि याबाबत एक धोरणात्मक निर्णय घेऊन हा प्रश्न सोडविला जाईल. या प्रश्नाच्या अनुषंगाने खरे तर याबाबत प्रावधान नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्या व्यक्तीची आर्थिक अडचण समजून तेथील वैद्यकीय अधिकाऱ्याने जर सांगितले की, गरीब माणूस असल्याने आपण या ॲम्बुलन्समधून घेऊन जा... परंतु जे ड्रायव्हर ऑन ड्यूटी असताना ते कर्तव्य बजविण्यासाठी आले नाहीत त्या तिन्ही ड्रायव्हर्सना आपण कामावरुन काढून टाकण्याची कार्यवाही केली आहे. याबाबत तत्परतेने सर्व गोष्टी झाल्या आहेत. एस्कॉम नावाची जी संस्था आहे त्यांना या कारवाईसंबंधी सूचना दिल्या आहेत. एस्कॉमच्या बाबतीत दुसरी कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे एस्कॉमची नियुक्ती थेट रद्द करण्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री. अमित साटम यांची भावना लक्षात घेऊन याबाबत उपसंचालक यांना अधिक ज्यादाच्या परफॉर्मन्ससंबंधी सूचना दिल्या असून त्याबाबत तपासणी केली जाईल आणि योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी सांगितले की, नगरपालिका आणि महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांची ही जबाबदारी आहे. मग ग्रामीण भागात कोणत्या संस्थेची ही जबाबदारी असेल ते मंत्री महोदयांनी सांगावे. खेडेगावात नगरपालिका किंवा नगरपालिका क्षेत्राच्या बाहेर जो ग्रामीण भाग येतो त्या ठिकाणी याबाबत कोणाची जबाबदारी येते, हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

ता.प्र.क्र.४०५५४...

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, शक्यतो उपचारासाठी आलेले रुग्ण हे एक तर उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालयामध्ये येतात. त्या ठिकाणी या सुविधा उपलब्ध असाव्यात, अशी या मागील भूमिका आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाबतीत हा विषय येतो. ग्रामीण भागाच्या संदर्भात तो विषय तिथल्या तिथेच असतो. त्यामुळे स्थानिक स्तरावर तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेने तो विषय सोडविला पाहिजे.

श्री. फारुख शाह : अध्यक्ष महोदय, मी धुळे शहराचे प्रतिनिधीत्व करतो. माझ्या मतदार संघातील इन्स्टिट्यूट ऑफ युरोलॉजी, धुळे या दवाखान्याविषयी नागरिकांच्या अनेक तक्रारी येत आहेत. महात्मा फुले जीवनदायी योजनेत भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येत आहे.

**उपाध्यक्ष :** हा प्रश्न जरी वेगळा असला तरी सन्माननीय सदस्य पहिल्यांदा प्रश्न विचारत असल्याने मी त्यांना बोलण्याची संधी देत आहे.

श्री. फारुख शाह : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या भ्रष्ट रुग्णालयाची जीवनदायी योजना रद्द करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न पूर्णपणे वेगळा आहे. पण तरी देखील सन्माननीय सदस्यांचे मत लक्षात घेऊन याबाबत चौकशी करुन तत्परतेने कार्यवाही केली जाईल.

डॉ. राहुल आहेर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न रुग्णवाहिका आणि शववाहिकेसंबंधी आहे. मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण एका अत्यंत बेसिक प्रश्नाला हात घातला पाहिजे की, रुग्णवाहिकेमध्ये शव वाहून न्यायचा नाही, ही प्रथा किंवा लेजिसलेशन फार जुने आहे. आता सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रकाश सोळंके यांनी सांगितले की, ग्रामीण भागामध्ये यासंबंधी खूप अडचणी येतात.

ता.प्र.क्र.४०५५४...

डॉ. राहुल आहेर...

आजच्या युगामध्ये रुग्णवाहिकेमध्ये शव वाहिल्याने नेमकी काय अडचण होते आणि आता आपण परत लेजिसलेशनकडे रि-व्हीजीट करायला पाहिजे काय की जेणेकरुन ॲम्बुलन्समधून जेथे गरज आहे तेथे शववाहिनी म्हणून वापर केला तर त्यामध्ये कोणतीही मेडिकल हरकत नाही. त्यामुळे आपण असे लेजिसलेशन का करु शकत नाही, हा माझा अत्यंत बेसिक प्रश्न आहे.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, मी एवढेच सांगितले की, तसे प्रावधान नाही, परंपरा नाही. परंतु सन्माननीय सदस्यांची सूचना असल्यामुळे सजेशन फॉर ॲक्शन.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४०५५४....

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, याच भागातील प्रसुती कळा येत असलेल्या महिलांना रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे अडीच तास थांबावे लागते, यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याच्या पाच ते सहा घटना मी काल स्वत: या ठिकाणी सांगितल्या आहेत. १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका असेल तर तिथे नेटवर्क नसल्यामुळे डोंगरावर चढून हा क्रमांक लावावा लागतो. यामुळे अडीच ते तीन तासाने रुग्णवाहिका येत असेल तर यामुळे त्या महिलेला प्रसुती वेदना होऊन बाळासहित तिचा मृत्यू होतो. अशा घटना घडत असताना स्थानिक स्वराज्य संस्था जर एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे हा विषय वळवत असेल तर ते चुकीचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निधी नसेल तर आपण त्याच्यासाठी विशिष्ट योजना आखून आपल्या विभागांतर्गत रुग्णवाहिका देणार काय ? लोकांचे हाल होत असतील आणि बायकांचा मृत्यू होत असेल तर याची जबाबदारी निश्चित करुन शववाहिनीच्या बाबतीत सुद्धा आपण अशीच जबाबदारी निश्चित करणार काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. भारती लव्हेकर यांनी क्र. १०२ च्या रुग्णवाहिकेबाबत सांगितले आहे. मला सभागृहाला सांगण्यास आनंद होतो की, यावर्षी आपण जवळपास १००० रुग्णवाहिका बदलल्या आहेत. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत आपण क्र. १०२ च्या नवीन रुग्णवाहिका विशेष डिलेव्हरीच्या रुग्णांसाठी घेतली जाते. १००० रुग्णवाहिकांची नवीन फ्लिट दिलेली आहे. या व्यतिरिक्त सर्वांना १०० टक्के शववाहिनी उपलब्ध व्हायला पाहिजे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार, माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या संमतीने सभागृहाला सांगतो की, प्रत्येक नगरपालिकेच्या क्षेत्रात शववाहिनी उपलब्ध करुन दिली जाईल. अशा पद्धतीच्या सर्व निधीची व आदेशाची बाब ताबडतोब पूर्ण केली जाईल.

श्री. अनिल पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सोळंके यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबत माननीय मंत्र्यांनी पाहिजे तसे उत्तर दिलेले नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मृतदेह वाहण्यासाठी जी

ता.प्र.क्र. ४०५५४....

श्री. अनिल पाटील....

रुग्णवाहिका वापरली जात नाही किंवा ग्रामीण भागात कोणत्या यंत्रणेमार्फत शववाहिनी वापरली जाऊ शकते किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तशी व्यवस्था होऊ शकते काय किंवा ग्रामीण रुग्णालयाला तशी व्यवस्था होऊ शकते काय ? याचे उत्तर माननीय मंत्र्यांनी द्यावे.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, मी बऱ्याचवेळा सांगितले की, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय या सर्व ठिकाणी शववाहिनी देण्यासाठी आपण व्यवस्था करीत आहोत. या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांनी नवीन विचार सांगितला की, रुग्णवाहिकेमध्ये हा विषय घेता येईल काय तर या बाबतीत सुद्धा निश्चितप्रकारे तपास करुन प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला रुग्णवाहिका असल्यामुळे त्याचा ही उपयोग करता येऊ शकेल.

-------

अप्रकाशित प्रत

## शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील चांदोली धरणाच्या डाव्या कालव्याची व त्यावरील पोट कालव्यांमधून होणारी गळती थांबविण्याबाबत

**(४) * ४१७२८ डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि. सांगली) तालुक्यातील चांदोली धरणापासून सुरु होणाऱ्या ० ते २६ किलोमीटरच्या वारणा डाव्या कालव्याच्या व पोट कालव्याच्या गळतीमुळे तेथील १० हजार अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन नापीक झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गळतीमुळे बाधित होणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना कोणतेही पीक घेता येत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांचेवर उपासमारी व मजूरी करण्याची वेळ आली असतानाही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून गळती थांबविण्यासाठी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बाधीत शेतकऱ्यांना अर्थिक मदत देण्यासह कालव्यातून जमिन क्षेत्रामधे होणारी गळती थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्य कालव्यामधून पाझरून तसेच कालवा विमोचकामधून पाणी येत असल्याने अंदाजे ५० हेक्टर क्षेत्र नापीक होत आहे व कालवा विमोचकाची दुरूस्ती यांत्रिकी विभागामार्फत प्रगतीत आहे.

(२) नाही.

(३) कालवा विमोचकाची दुरूस्ती विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ता. प्र. क्र. ४१७२८....

डॉ. विनय कोरे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला उत्तरामध्ये दुरुस्ती करायची नाही.

डॉ. विनय कोरे : अध्यक्ष महोदय,सदरच्या प्रश्नाबाबत माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर हे पूर्णपणे सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. मी आज मुद्दामहून सकाळी ९.३० वाजताचे त्या गावातील गळती असणाऱ्या शेतीचे फोटो अक्षांश रेखांशासह काढून आणलेले आहेत. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर हे सर्व फोटो मी माननीय मंत्र्यांकडे सुपुर्द करतो. या गळतीमुळे गोरगरीब शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असेल आणि आपला विभाग त्याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष करणार असेल तर यावर शासन तातडीने कोणती उपाययोजना करणार आहे, हा माझा पहिला स्पेसिफिक प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न आहे की, ० ते २६ किलोमीटरच्या कॅनॉलमध्ये प्रस्तावित ११,००० हेक्टर क्षेत्र आपण पाण्याखाली आणणार होतो. परंतु आज प्रत्यक्ष १०० हेक्टर क्षेत्र सुद्धा पाण्याखाली आणलेले नाही. ही वस्तुस्थिती खरी आहे काय ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. विनय कोरे यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मागच्या दोन आठवड्यापूर्वी मी त्याच भागातून आलो आहे. परंतु तेथील ग्रामस्थांनी माझ्याकडे काही स्पेसिफिक तक्रारी केलेल्या नाहीत. काही ठिकाणी लिकेजेस आहेत हे खरे आहे.साधारणपणे डाव्या बाजुची लांबी २६ किलोमीटर आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. जयंत पाटील.....

जल सेतूने पाणी उजव्या बाजुला गेले आहे. जिओ सिंथेटींक लायनिंग १० कि.मी चे झालेले आहे. वरचे अडीच कि.मी.चे अंदाजपत्रक तयार आहे. ते झाल्यानंतर गळती पूर्णपणे थांबेल. खोदकाम कालवा लांबी साडे तेरा कि.मी. आहे. यामध्ये १४ किमी, १४,१८,१९ व २१ येथील युसीआर लायनिंग खराब झाले आहे. त्यातून गळती होत आहे. हे आपले म्हणणे खरे आहे. मायनर १,४,८,१८,१९,२० च्या कामाच्या निविदा अंतिम झाल्या असून जून, २०२२ पर्यंत पूर्ण करता येतील. ही गळती थांबवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश आपला प्रश्न आल्यानंतर दिलेले आहेत.

**उपाध्यक्ष :** आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

**प्रधान सचिव** : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपाध्यक्ष** : शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---------

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

## माननीय मंत्री श्री.नवाब मलिक यांच्या राजीनाम्याबाबत

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांच्या संबंधी आम्ही सातत्याने या ठिकाणी विषय मांडत आहोत. काल देखील या सदनासमोर सविस्तर वस्तुस्थिती मांडलेली आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, या सदनामध्ये माननीय मंत्री यांनी हे जाहीर करावे. महाराष्ट्र राज्याचे एक मंत्री कारागृहात आहेत. तरी देखील ते मंत्री पदावर आहेत, हे योगय नाही. माझी विनंती आहे की, तत्काळ माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांचा राजीनामा घेतला पाहिजे किंवा त्यांना मुख्यमंत्री महोदयांनी तत्काळ आपल्या मंत्रिमंडळातून काढले पाहिजे. या संबंधी सदनात आता काही तरी घोषणा झाली पाहिजे. एवढया गोष्टी घडल्यानंतर महाराष्ट्राचे सरकार जर त्यांच्या पाठीशी उभे राहिले तर जणु काही हे सरकार दाऊदच्या पाठीशी उभे आहे काय, अशा प्रकारचा विचार या संपूर्ण राज्यात होईल. त्यामुळे माझी विनंती आहे की, माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांचा राजीनामा घेतला पाहिजे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

**उपाध्यक्ष :** अशा गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सदनाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे, मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी १२.०३ ते १२.३३ वाजे पर्यंत स्थगित झाली )

--------

**( स्थगितीनंतर )**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट)**

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, ...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले आपले काय म्हणणे आहे?

**विधानसभेच्या १२ सन्माननीय सदस्यांच्या**

**निलंबनाबाबत कार्यपध्दती विषयक मुद्दा**

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, माझा कार्यपध्दती विषयक मुद्दा आहे. आपण या सभागृहातील १२ आमदारांना १ वर्षाकरिता निलंबित केले होते. त्यांचा निलंबनाचा कालावधी अद्याप पूर्ण व्हायचा आहे. परंतु, ते १२ आमदार आपल्या सभागृहात बसत आहेत. आपण त्यांना सभागृहामध्ये कोणत्या बिझनेस रुल अंतर्गत बसवता, ही सर्व माहिती सभागृहाला समजली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज हे आपल्या बिझनेस रुलप्रमाणे चालते. हे १२ आमदार या सभागृहात कसे आले, त्यांना आपण केव्हा आणले, ते या सभागृहात कसे बसतात, कोणत्या नियमाने बसतात याची सविस्तर माहिती आम्हाला हवी आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे.

...........

**पृ.शी. / मु.शी.** : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. दिलीप वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

..............

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-१८ चे अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट):** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

---------

श्री.हसन मुश्रीफ (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने

(क) सन २०१८-२०१९ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील अठ्ठेचाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल

व

(ख) सन २०१९-२०२० चे ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ पालघर/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ जालना/ परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** पुनर्विलोकन व वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----------

असुधारित प्रत

श्री.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई प्राधिकरणाचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो. सदरहू लेखे विधानसभेच्या पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाची कारणे सोबत जोडली आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू लेखे विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.: स्थगन प्रस्तावाच्या सूचना**

**तालिका सभाध्यक्ष :** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

---------

**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत.**

**तालिका सभाध्यक्ष** : आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक चार वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १,२ व ३ पुढे ढकलण्यात येत आहेत.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.:** दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. I OF 2022 (A BILL TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांचा आहे, दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचा आहे व तिसरा प्रस्ताव ॲड. राहुल कुल यांचा आहे. त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

**तालिका सभाध्यक्ष :** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा घेण्यात येईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.तेलंग...

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ४ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १ संमत झाले आहे.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक.

MOTION FOR DISAPPROVAL OF ORDINANCE NO. I OF 2022 (AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962 AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.) AND L. A. BILL NO. III OF 2022 (A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962 AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

**तालिका सभाध्यक्ष :** अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री.संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३ – मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार, दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस, तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर व चौथा प्रस्ताव सन्माननीय सदस्य ॲड.राहुल कुल यांनी दिला आहे. त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**तालिका सभाध्यक्ष :** आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३ संमत झाले आहे.

-------

**पृ.शी./ मु.शी. :** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०० अन्वये राज्यपालांच्या अधिसंमतीसाठी पाठविण्यात आलेले व राज्यपालांनी फेरविचारार्थ परत पाठविलेले सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९- महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ मधील खंड २२ बाबत म.वि.स. नियम १५३ अन्वये फेरविचार करणे.

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक याबाबत राज्यपालांच्या संदेशानुसार विधेयकातील खंड २२ महाराष्ट्र विधानसभा नियम १५३ अन्वये फेरविचारार्थ घेण्यात यावा, असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब पाटील.......

अध्यक्ष महोदय, विधेयक संमत करण्यापूर्वी मी या विधेयकाबाबत थोडक्यात माहिती देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सहकारी कायदा हा सन १९६० मध्ये पारित केलेला आहे. या कायद्याच्या माध्यमातून सहकारी संस्थांचे कामकाज सुरु आहे. ९७ वी घटना दुरुस्ती होत असताना मध्यंतरी काही बाबींना सूट देण्यात आली होती. माननीय सर्वोच्च न्यायालयाने ९७ व्या घटना दुरुस्तीला स्थगिती दिली व ती दुरुस्ती रद्द केली. त्यामुळे सन १९६० पासून वापरण्यात येणाऱ्या मूळ कलमाचा या विधेयकात अंतर्भाव केला आहे. यात क्रियाशिल आणि अक्रियाशिल सभासदांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे एखादा सदस्य दोन संस्थेमध्ये काम करीत असेल तर त्याला तसे काम करता येणार नाही, अशी तरतूद या विधेयकान्वये करण्यात आली आहे. पूर्वी२१ सदस्यांपेक्षा अधिक सदस्य असू नयेत, अशी तरतूद करण्यात आली होती. या राज्यात काही जिल्ह्यात तालुक्यांची संख्या अधिक आहे. त्याठिकाणी महिलांसाठी राखीव जागा, ओबीसी आरक्षण असेल तर ती संख्या २१ पेक्षा अधिक असली पाहिजे. त्याप्रमाणे तशी सुधारणा करण्यात आली आहे. काही संस्था ह्या केवळ महिलांकरिता आहेत. काही संस्था मागासवर्गीयांकरिता आहेत. अशा वेळेस आरक्षित जागा मिळणे अवघड असते. त्यामुळे या कायद्यातील कलमांचा वापर करुन त्यामध्ये सूट देता येईल. अशी तरतूद यात करण्यात आली आहे. विधेयकातील कलम ७३ कअ मध्ये सभासदांच्या सदस्यत्वाची निरर्हता..... एखादा संचालक थकबाकीदार असेल किंवा कलम ७९ नुसार कारवाई झाली असेल किंवा कलम ८८ अंतर्गत त्याला जबाबदार धरले असेल तर तो त्या संस्थेचा सदस्य पात्र ठरत नाही. या कायद्यात असाही बदल केला आहे की, २ पेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती संचालक पदावर राहू शकत नाही. अशा प्रकारच्या कलमांचा त्यामध्ये समावेश केला आहे. मी उल्लेख केलेल्या तीन गोष्टीमध्ये कधीही कोणालाही सूट दिली नाही. एखादा व्यक्ती कलम ८८ नुसार जबाबदार असेल तर त्याला अपात्र केले आहे. २ पेक्षा अधिक मुले असतील तर त्याही व्यक्तीला अपात्र केले आहे.

श्री. बाळासाहेब पाटील .....

अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षापासून कोरोना महामारी सुरु झाली आहे. शासनाकडे अधिकार असल्यामुळे वार्षिक सभा घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. मध्यंतरी कोल्हापूर, सांगली भागामध्ये महापूर आला होता. अशा वेळेस ऑडिटचा कालावधी वाढविण्यासाठी, वार्षिक सभा घेण्यासाठी सवलत देणे, असे अधिकारही याद्वारे घेतले आहेत. यादृष्टीने हे विधेयक अतिशय महत्त्वाचे आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** राज्यपालांनी विधेयकातील खंड २२ च्या फेरविचाराबाबत संदेश पाठविला असल्यामुळे आता फक्त खंड २२ विचारात घेण्यात येईल.

विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे खंड २२ हा विधेयकाचा भाग झाला.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक ३९ राज्यपालांच्या संदेशानुसार विधेयकातील खंड २२ फेरविचारार्थ घेण्यात येऊन विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे विधेयक पुन्हा संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक ३९ विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे पुन्हा संमत झाले आहे.

--------

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

**पृ.शी. :** मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

MOTION FOR DISAPPROVAL OF ORDINANCE NO.II OF 2022 (AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.) AND L. A. BILL NO. IV OF 2022 (A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE.

**तालिका सभाध्यक्ष :** अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री.संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ४ – मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार, दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस, तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर व चौथा प्रस्ताव सन्माननीय सदस्य ॲड.राहुल कुल यांनी दिला आहे. त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**तालिका सभाध्यक्ष :** आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ४ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ४ संमत झाले आहे.

---------

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आता सभागृहामध्ये मंजूर झालेल्या विधेयकांना कोणीही विरोध केलेला नाही. त्यामुळे ही सर्व विधेयके एकमताने मंजूर झाली आहेत असे रेकॉर्डवर घेण्यात यावे, ही विनंती.

**तालिका सभाध्यक्ष :** आज संमत करण्यात आलेली सर्व विधेयके एकमताने संमत करण्यात आली आहेत.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** सदस्यांच्या अटकेसंबंधी घोषणा.

**तालिका सभाध्यक्ष :** मला अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह, मुंबई यांचेद्वारे कळविण्यात आले आहे की, मा.शहर सत्र न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ०७.०३.२०२२ रोजीचे रिमांड आदेशान्वये द डायरेक्टर ऑफ इन्फोर्समेंट (ECIR/MBZO-I/१०/२०२२) प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरींग ॲक्ट अंडर सेक्शन ३, ४ केसमध्ये श्री.नवाब मोहम्मद इस्लाम मलिक, विधानसभा सदस्य यांना दिनांक ०७.०३.२०२२ रोजी १७.२० वाजता मुंबई मध्यवर्ती कारागृहामध्ये दाखल करण्यात आले असून त्यांना सुरक्षेच्या कारणास्तव सर्कल क्र.१२ येथे ठेवण्यात आलेले आहे.

---------

असुधारित प्रत

**म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावाबाबत**

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, काल सभागृहामध्ये नियम २९३ अन्वये प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. सदर प्रस्तावावर आज मंत्र्यांचे उत्तर घेण्याचे ठरले होते. त्या अनुषंगाने मी उत्तर देण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपणास व मला देखील विनंती केली आहे की, काही कारणास्तव ते आज सभागृहामध्ये उपस्थित राहू शकत नाहीत व त्यामुळे आज होणारे मंत्र्यांचे उत्तर उद्या घेण्यात यावे.

त्या अनुषंगाने माझी आपणास विनंती आहे की, नियम २९३ अन्वये प्रस्तावावर आज होणारे मंत्र्यांचे उत्तर उद्या घेण्यात यावे.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील मंत्री महोदयांचे उत्तर उद्या घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५५ मिनिटांनी, गुरुवार दिनांक १० मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत